# जीपी पारसिक बँक

गोपीनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

कळवा, ठाणे - ४०० ६०५. रजि. नं. एमएससीएस/सीआर/१२१३/२०१५ दि.२६/०३/२०१५.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १४ ऑगस्ट, २०१६** रोजी **सकाळी १०.३०** वाजता खालील विषयांकरीता **'गडकरी रंगायतन' नाट्यगृह, तलावपाळी, ठाणे** येथे घेण्यांत येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. ९ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. वार्षिक अहवाल विचारार्थ ठेवणे व त्यास मंजूरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०१६ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.

३. सन २०१४-१५ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.

४. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०१६ अखेरच्या नफा वाटणीस व लाभांश वाटणीस मंजूरी देणे.

५. सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

६. बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण तेलंगणा राज्यात वाढविणेबाबत मंजूरी घेणे.

७. बँकेचे पोटनियम क्र. १(a) १(d) व २ (x) मध्ये दुरुस्ती करणेबाबत मंजूरी देणे.

८. सर्वसाधारण सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.

९. सन २०१६-१७ करीता वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे. संचालक मंडळ मे. गोगटे ॲण्ड कंपनी यांची सन २०१६-१७ करीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करीत आहे.

१०. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार बुडीत व संशयित येणे बाकी माफीस मंजूरी देणे.

११. मल्टी स्टेट को–ऑपरेटीव्ह सोसायटीज् ॲक्ट, २००२ च्या सेक्शन ३९ (३) नुसार संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जांचा तक्ता माहितीकरीता.

१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : २८/०७/२०१६.
ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे – ४०० ६०५.
नोंदणीकृत कार्यालय : 'सहकारमूर्ती गोपीनाथ शिवराम पाटील भवन', पारसिक नगर, कळवा, ठाणे – ४०० ६०५.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**सदानंद कृ. नायक**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**टीप :-** १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस पोटनियम क्र. ३०(iii) नुसार गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) बँकेच्या उपविधी क्र. २९(C) नुसार सर्वसाधारण सभेची नोटीस, संक्षिप्त ताळेबंद, नफा तोटा पत्रक, लेखा परिक्षण अहवाल व सुचविलेली उपविधी दुरुस्ती बँकेच्या वेबसाईटवर प्रसारीत केली आहे. त्याची छापील प्रत व अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे. आपण जवळच्या शाखेतून दि. २९.०७.२०१६ नंतर आपला अहवाल घेऊन जावा व सभेस येताना अहवाल / नोटीस अथवा सभासद ओळखपत्र सोबत घेऊन यावे.

३) ज्या सभासदांना वार्षिक सभेत काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. ६ ऑगस्ट, २०१६ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या कार्यालयीन वेळेत तसे लेखी कळविल्यास त्याचीच नोंद घेण्यात येईल.

## Suggested amendments in Bye-Laws in Annual General Meeting 2016

| SR. No | Bye Law No | Existing Bye Laws | Proposed Bye Laws | Reasons for amendment |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 (a) | **NAME, ADDRESS AND AREA OF OPERATION:**<br>The Bank shall be called as GOPINATH PATIL PARSIK JANATA SAHAKARI BANK LTD., THANE.<br>However the Bank may use short name "GP PARSIK BANK" for brand building; logo; advertisement; stationary; publicity material; name board; letterhead etc. | **NAME, ADDRESS AND AREA OF OPERATION:**<br>The Bank shall be called as "GP PARSIK SAHAKARI BANK LTD., KALWA, THANE.<br><br>However the Bank may use short name "GP PARSIK BANK" for brand building; logo; advertisement; stationary; publicity material; name board; letterhead etc. | As per RBI Circular UBD.BPD.(PCB) Cir. No. 26/14.01.062/2014-15 dated 30.10.2014, the bank should display full name of the Bank with same font size as displayed for abridged name. Hence name of the bank needs to be shortened to accommodate full name with same font size on name board, letterhead etc. |
| 2. | 1 (d) | The area of operation of the Bank shall be confined to the whole State of Maharashtra and Goa. For any revision in this regard, prior approval of the Reserve Bank of India as also the Registering Authority shall be necessary. | The area of operation of the Bank shall be confined to the whole State of Maharashtra, Goa, Karnataka and Telengana State. For any revision in this regard, prior approval of the Reserve Bank of India as also the Registering Authority shall be necessary. | RBI and RCS - Karnataka have issued NOC for extension of area of operation to the entire State of Karnataka. We are in the process of registering the same with the Central Registrar, New Delhi. This year Board of Directors propose to extend the area of operation to the entire State of Telengana. |
| 3. | 2 (x) | "Person" means an adult individual competent to contract Indian Contract Act 1872, proprietary concern, partnership firm duly registered under the Indian Partnership Act 1932, Limited Liability Partnership (LLP), company or any other body corporate constituted under the law for the time being in force, society registered under the Societies Registration Act of 1860, State Government, Central Government, local authority, Self Help Group (SHG), Joint Liability Group (JLG), Trust registered under any law for the time being in force; | "Person" means an adult individual competent to contract Indian Contract Act 1872, proprietary concern, partnership firm duly registered under the Indian Partnership Act 1932, Limited Liability Partnership (LLP), company or any other body corporate constituted under the law for the time being in force, society registered under the Societies Registration Act of 1860, State Government, Central Government, local authority, Self Help Group (SHG), Joint Liability Group (JLG), Trust registered under any law for the time being in force; and HUF. | Some of the HUF firms in Mumbai, Thane & Ichalkaranji areas also want to avail credit facilities. They can avail only it they are made members of the Bank. For this purpose definition of "Person" who can be admitted as members needs to include HUF also. |

# मा. अध्यक्षांचे मनोगत

**बँकेचे संस्थापक -** अध्यक्ष स्वर्गीय गोपीनाथ पाटील साहेब यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करीत आहे. बँकेचा सन २०१५-१६ चा ४५ वा वार्षिक अहवाल व ३१ मार्च, २०१६ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षक मे. गोगटे आणि कंपनी यांनी तपासणी केलेला ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक आपणापुढे सादर करताना मला आनंद होत आहे.

**बँकींग क्षेत्राचा आढावा :-** जागतिक आर्थिक मंदीचा नकारात्मक प्रभाव अद्याप असूनही भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ७ ते ७.५० टक्के इतकी वार्षिक लक्षणीय वाढ दिसून येते. कर्जाच्या मागणी अभावी देशातील बँका जाणीवपूर्वक मोठया ठेवींना जास्त व्याजदर देऊ शकल्या नाहीत. परिणामत: भारतीय बँका आवश्यक त्या ठेवी व कर्जामध्ये वाढ करु शकल्या नाहीत. तसेच जास्त नफाही मिळवू शकल्या नाहीत. ब-याच राष्ट्रीयकृत बँकांना मोठया अनुत्पादीत कर्जांचा फटका बसला असून त्यांना तोटा सहन करुनसुध्दा जास्त रकमेच्या तरतूदी करणे भाग पडले आहे. या वर्षभरात रिझर्व्ह बँकेने ११ पेमेंट बँका, १० छोटया बँका व २ युनिवर्सल बँकांना परवाने दिले आहेत. याचाच अर्थ बँकींग क्षेत्रामध्ये नवीन संकल्पना तसेच नाविन्यपूर्ण उत्पादने घेऊन हया बँका सध्याच्या बँकांशी स्पर्धा करतील. बँकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ग्राहकांना अद्यावत सेवा देण्यासाठी नवनवीन बँकींग उत्पादने व सेवांची साधने यामध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील. आपली अर्थव्यवस्था मा. पंतप्रधानांच्या "डिजीटल इंडिया" च्या संकल्पनेनुसार डिजीटल होत आहे. आपल्या बँकेने ठेवींमध्ये एकूण १२.८०% व कर्जामध्ये २२.१४% व एकंदर व्यवसायामध्ये १६.२५% इतकी वाढ केली आहे, जी बँकींग क्षेत्राच्या एकूण सरासरी वाढीपेक्षा बरीच जास्त आहे.

**बँकेच्या प्रगतीचा धावता आढावा :-** आपल्या बँकेने ₹ २४४५ कोटीच्या ठेवी व ₹ १५४७ कोटींची कर्ज असा एकूण ₹ ३९९० कोटीच्या व्यवसायाचा टप्पा पार पाडला आहे तसेच ₹ ३२.०७ कोटी इतका करकपातीनंतरचा नफा मिळविला आहे.

**ठेवीः-** सन २०१४-१५ या कालावधीत एकूण ₹ ३३२ कोटी ठेवींच्या वाढीच्या तुलनेत सन २०१५-१६ या कालावधीत ठेवींमध्ये ₹ २७७.६२ कोटींनी वाढ झाली. बँकींग उद्योगामध्ये कासा डिपॉझीटचे बाबतीत आपल्या बँकेने आजही वर्चस्व राखले आहे. बँकेने DICGC येथे प्रत्येक ठेवीदाराकरीता ₹ १ लाखापर्यंतच्या ठेवींचा विमा काढला आहे.

**ठेवींच्या व्याजावरील करकपात :-** आयकर कायदा १९६१ मधील कलम १९४ मधील झालेल्या बदलाची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

**कर्जव्यवहार :-** सन २०१४-१५ या कालावधीत एकूण ₹ १५५ कोटी कर्जाच्या वाढीच्या तुलनेत सन २०१५-१६ या कालावधीत कर्जामध्ये ₹ २८०.५१ कोटींनी वाढ झाली. त्यामुळे कर्जाचे एकूण ठेवींशी ६३.२८ टक्के इतके प्रमाण आहे जे सन २०१४ – १५ मध्ये ५८.४५ टक्के होते. सन २०१६-१७ मध्ये हेच प्रमाण ६७ टक्क्यापर्यंत नेण्यात बँक प्रयत्नशील असेल. यावर्षी बँकेने एसएमई क्षेत्राची कर्जामध्ये वाढ करण्यासाठी निवड केली आहे.

**थकबाकी व अनुत्पादित कर्जाचे व्यवस्थापन :-** या आर्थिक वर्षात आर्थिक स्थितीमुळे ब-याच बँकांच्या अनुत्पादीत कर्जामध्ये वाढ झालेली दिसून येते. आपल्या बँकेची ढोबळ अनुत्पादीत कर्जे २.५ टक्क्यापेक्षा कमी असून निव्वळ अनुत्पादीत कर्जे शून्य टक्के आहेत. आपल्या बँकेचा कव्हरेज रेशो हा बँकींग क्षेत्रात जास्तीत जास्त आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार बँकेचे थकीत कर्जदार अथवा त्यांच्या जामीनदारांचे फोटो नावासहीत वृत्तपत्र तसेच इतर प्रसार माध्यमातून बँकेस प्रसिध्द करता येऊ शकतात. सर्व थकीत कर्जदार सभासदांना नम्र विनंती आहे की, त्यांनी थकबाकीची रक्कम भरावी व त्यांच्याविरुध्द अशा प्रकारच्या कठोर उपाययोजनांची अंमलबजावणी करावी लागू नये यासाठी बँकेस सहकार्य करावे.

**गुंतवणूक :-** बँकेची एकूण गुंतवणूक ₹ १,०७६.८२ कोटी आहे. गुंतवणूकीकरीता आवश्यक असलेल्या तरतूदी रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केल्या आहेत.

**संचालक मंडळ सभा :-** अहवाल वर्षात बँकेच्या संचालक मंडळाच्या एकूण १९ सभा झाल्या आहेत. सर्वसाधारणपणे सभांना सर्व संचालक उपस्थित असतात व सर्व निर्णय सार्वमताने घेतले जातात. बँकेच्या उपविधी क्र.४३ नुसार बँकेने कार्यकारी समितीची स्थापना केली असून बँकेच्या दैनंदिन कामकाजाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी आठवड्यातून एकदा या समितीची सभा घेतली जाते. या बाबतचे निर्णय घेण्यासाठी आवश्यक ते अधिकार कार्यकारी समितीस प्रदान केलेले आहेत. याशिवाय कर्ज समिती, कर्मचारी समिती, हिशोब तपासणी समिती, वसूली समिती वेळोवेळी नियमित आपल्या सभा घेऊन प्रदान केलेल्या अधिकार कक्षेत निर्णय घेत असतात.

**नफा :-** या वर्षी बहुतांश बँका जेव्हा तोटा किंवा कमी नफा घोषित करीत आहेत तेव्हा आपली बँक आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता ₹ ३२.०७ कोटी इतका लक्षणीय निव्वळ नफा दर्शवित आहे. कायद्यांच्या आणि उपविधींच्या तरतूदींनुसार बुडीत व संशयित कर्जाची प्रकरणे बुडीत खाती वर्ग करण्यासाठी संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

**लाभांश :-** बँकेच्या भविष्यातील वाढीचा विचार करुन व सक्षम भांडवल पर्याप्तता निर्माण करुन, अहवालवर्ष २०१५-१६ करीता हे संचालक मंडळ जास्तीत जास्त देता येण्याजोगा १५% लाभांश भागधारण कालावधीनुसार (Pro- rata) पध्दतीने देण्याची शिफारस करीत आहे.

**भांडवल पर्याप्तता :-** या अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण २०.४३ टक्के असून टीयर १ कॅपीटलमध्ये ९१.४५ टक्के आहे.

**शाखाविस्तार :-** अहवाल वर्षात बँकेने गोवा राज्यासहीत एकूण ११ शाखा उघडल्या आहेत. तसेच १ एप्रिल, २०१६ पासून आजपर्यंत एकूण सात शाखा उघडल्या आहेत. आजमितीस शाखांची एकूण संख्या ६८ झाली आहे. राहिलेल्या दोन शाखा ऑगस्ट, २०१६ पर्यंत उघडण्यात येतील. म्हणजेच ऑगस्ट, २०१६ पर्यंत बँकेच्या एकूण ७० शाखा होतील. बँकेच्या वार्षिक शाखा विस्तार आराखडा, २०१६-१७ नुसार रिझर्व्ह बँकेने अजून १० शाखा उघडण्यास परवानगी दिलेली आहे. ज्यायोगे २०१७ अखेरपर्यंत बँकेच्या एकूण ८० शाखा होतील. म्हणजेच बँकेच्या २०२० अखेरपर्यंतच्या १०० शाखा उघडण्याच्या उद्दीष्टपूर्तीकडे आपण योग्य पध्दतीने वाटचाल करीत आहोत. या वर्षात बँकेने आपली नाशिक शाखा, अंबड येथील प्रशस्त जागेत स्थलांतरीत केली तर खारकर आळी शाखा ही स्वत:च्या मालकीच्या प्रशस्त जागेत स्थलांतरीत केली. यावर्षी बँकेने भाईंदर, इचलकरंजी व काल्हेर येथे ३ ऑफसाईट एटीएम उघडलेत. रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण कर्नाटक राज्यात वाढविण्याकरीता नाहरकत दाखला दिलेला आहे. आपणांस निबंधक, सहकारी संस्था, कर्नाटक यांचे कार्यालयातून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे व केंद्रीय निबंधक, न्यु दिल्ली यांचेकडे उपविधी दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियेत आहोत. यावर्षी संचालक मंडळ आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण तेलंगणा राज्यामध्ये वाढविण्याची शिफारस करीत आहे.

**नॉन बँकींग व्यवसाय :-** बँकेने टाटा एआयजी व नॅशनल इन्शुरन्स कंपनीबरोबर सर्वसाधारण विम्याबाबत तसेच युटीआय इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि.,यांचे बरोबर पॅनकार्ड काढण्यासंदर्भात कार्पोरेट एजन्सीचे करार केले आहेत. तसेच बँकेने आपल्या व्यावसायिक ग्राहकांना पॉईंट ऑफ सेल (पॉस) मशिन्स दिले आहेत. बँक आयुर्विम्याकरीता सुध्दा कार्पोरेट एजन्सी घेण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**जोखीम व्यवस्थापन :** - बँकेने मुख्य कार्यालयामध्ये जोखीम व्यवस्थापन खात्याची स्वतंत्रपणे स्थापना केलेली आहे. बँकेतील मोठया कर्जदारांची आलेली कर्जप्रकरणे मंजूर करतेवेळी बँकेला येणा-या जोखमीच्या दृष्टीकोनातून त्याची छाननी करते.

**विदेशी विनिमय विभाग :-** बँकेला रिझर्व्ह बँकेकडून फॉरेन एक्सचेंज एडी २, परवाना मिळाला आहे. बँकेने फॉरेक्स विभागाची स्थापना करण्याकरीता व आपल्या बँकेतील कर्मचारी प्रशिक्षित करण्याकरीता तज्ञांची नेमणूक केलेली आहे. याचा उपयोग आपल्या सर्व शाखांतील ग्राहकांना विदेशी चलन विकत घेणे व देणे व्यवहाराकरीता होऊ शकेल. तसेच काही विशिष्ट शाखांमधून एनआरआई खाती उघडण्याकरीताही होऊ शकेल.

**बीसीएसबीआय :-** आपल्या बँकेने "बँकींग कोड अ‍ॅण्ड स्टॅन्डर्ड बोर्ड ऑफ इंडिया" यांचे सभासदत्व घेतले आहे. ही संस्था बँकींग क्षेत्रातील सेवेचा दर्जा वाढविणे संदर्भात परिषदा आयोजित करते तसेच ग्राहक हितासंदर्भात बँकांना सल्लाही देते.

**तंत्रज्ञान :-** बँकेने आपला निधी अनेक तंत्रज्ञानयुक्त अशा उत्पादनात म्हणजेच रुपे डेबीट कार्ड, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग, नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत इमिजीएट पेमेंट सिस्टीम, इंटरनेट बँकींग, फंड ट्रान्सफर तसेच ईलॉबी म्हणजेच ज्यात एटीएमव्यतिरिक्त चेक ची मागणी करणे, चेक तसेच रोख रक्कम भरणे व पासबुक छपाई करुन घेणे या सुविधांमध्ये गुंतविला आहे. बँकेने ISO२७००१ सर्टिफिकेटचे नुतनीकरण केले आहे. जागतिक तंत्रज्ञानाचा दर्जा कायम केला आहे. बँक वेळोवेळी आपल्या ग्राहकांना सावधानतेचा इशारा देणारे संदेश मोबाईल मार्फत देत असते. उदा. कोणत्याही खातेदाराने आपल्या खात्याबाबतची गोपनीय माहिती कोणासही देऊ नये जरी ती माहिती मागणा-या इसमाने तो बँकेचा कर्मचारी आहे असे भासविले तरीसुध्दा त्यास ती माहिती देऊ नये. या वर्षात रिझर्व्ह बँकेने युपीआय (युनिफाईड पेमेंट इंटरफेस) व बीबीपीएस (भारत बील पेमेंट सिस्टम) या दोन्ही सुविधा अंगीकारण्यास परवानगी दिलेली आहे. या दोन्ही सुविधा एनपीसीआय च्या चाचणी प्रक्रीयेत आहेत. युपीआय या सुविधेमार्फत एखादा ग्राहक आपल्या बँकेच्या अ‍ॅप्लीकेशनमार्फत दुस-या कुठल्याही बँकेच्या खात्यावरची रक्कम त्याच्या मोबाईलमार्फत तसेच कोणत्याही शाखेला भेट न देता ट्रान्सफर करु शकतो. जेव्हा एनपीसीआय क्रेडीट कार्डाचे वितरण करेल तेव्हा आपली बँक ही क्रेडीट कार्ड वितरणात सहभागी होईल. आपण यावर्षी इतर बँकांच्या तुलनेमध्ये "फुल्ली डिजीटल" या संकल्पनेत पुढे असू.

**मनुष्यबळ :-** बँकेचा विस्तार आराखडा कार्यान्वित करताना व्यावसायिकदृष्ट्या शिक्षित तसेच बँकींग क्षेत्रामधील सुयोग्य व पुरेसा अनुभव असणा-या व्यक्तींची वरीष्ठ पातळीवर नियुक्ती केली जात आहे. कर्मचा-यांना बँकींगमध्ये नित्यनव्या होणा-या बदलांना सामोरे जाण्याकरीता बँकेच्या मुख्य कार्यालयात प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. बँकेने सखोल माहिती पुस्तक (मॅनुअल ऑफ इंस्ट्रक्शन्स) तयार केले आहे. बँकेने "इनसाईट"या नावाचे मासिकही सुरु केले आहे.

**पीएमजेजेबीवाय व पीएमएसबीवाय :-** या वर्षभरामध्ये एकूण ६९८७ खातेधारकांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेखाली नोंदणी केली त्यापैकी ५ क्लेम्स मंजूर झालेत. तसेच एकूण १०९४४ खातेधारकांनी प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजनेखाली नोंदणी केली त्यापैकी १ क्लेम मंजूर झाला आहे. सभासदांनी या योजनांचा लाभ घ्यावा.

**संस्था संचालन** (**Corporate Governance**) :- कामाची योग्य विभागणी व नियोजन करण्यासाठी बँकेने विविध विभागांची स्थापना केली आहे. व त्यांच्या वेळोवेळी सभा घेतल्या जातात.

**सामाजिक बांधिलकी :-** या अहवालवर्षी बँकेने विविध संस्थांना आर्थिक मदत केली व वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले.

**हिशोब तपासणी :-** सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळ मे. गोगटे अ‍ॅण्ड कंपनी यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करीत आहे. त्यांच्या नियुक्तीबाबतचा विषय नोटीसमध्ये क्र. ९ वर आहे.

**श्रध्दांजली :-** या अहवाल वर्षात देवाज्ञा झालेले बँकेचे सभासद, खातेदार आणि हितचिंतक यांना बँकेतर्फे विनम्र श्रध्दांजली !

**गौरव :-** १.बँकेला दि महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बँक्स फेडरेशन यांच्यातर्फे प्रथम क्रमांकाचा "सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार" मिळाला. २."बँको पुरस्कार २०१५" चा द्वितीय क्रमांक अ‍ॅव्हीएस पब्लीकेशन, कोल्हापूर आणि गॅलक्सी कॉन्सेलिंग, पुणे यांच्यामार्फत मिळाला. ३. "बेस्ट बँक विथ मार्केटींग इनोव्हेशन" हा पुरस्कार बँकींग फ्रंटीयर मॅगझीनतर्फे मिळाला. ४. लोकमत पेपरतर्फे "बँक विथ बेस्ट कस्टमर ओरिएन्टेशन इन को.ऑप.बँक" हा पुरस्कार मिळाला. ५. बिस्ट्रीम मेडिया वर्क्स यांच्यातर्फे "इन्फोसेक सिक्युरिटी मॅस्ट्रोस अ‍ॅवार्ड, २०१६" पुरस्कार मिळाला.

**ऋणनिर्देश :-** बँकेच्या प्रगतीशिल वाटचालीतील योगदान दिलेल्या सर्व घटकांच्या सक्रीय सहभागाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच यापुढेही त्यांच्या सहकार्याची अपेक्षा करुन हा अहवाल पूर्ण करतो.

जय हिंद! जय सहकार!

आपला विश्वासू,

**रणजीत गोपीनाथ पाटील**
**अध्यक्ष**

(४५ व्या वार्षिक अहवालात अध्यक्षांचे सविस्तर मनोगत दिलेले आहे. वरील मनोगत हे त्याचे संक्षिप्त रुप आहे.)

# जीपी पारसिक बँक

गोपीनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

(₹ in lakh)

## दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर ताळेबंद पत्रक

| भाग भांडवल व देणी | ३१ मार्च, २०१६ ₹ | ३१ मार्च, २०१५ ₹ | मालमत्ता व येणी | ३१ मार्च, २०१६ ₹ | ३१ मार्च, २०१५ ₹ |
|---|---|---|---|---|---|
| अधिकृत भागभांडवल | 50000.00 | 50000.00 | रोख | 14980.50 | 14204.13 |
| भाग भांडवल | 6394.44 | 5394.10 | बँकेतील शिल्लक | 26835.41 | 22123.17 |
| गंगाजळी व इतर निधी | 31411.85 | 28893.13 | मागणी योग्य रोखे (मनी ॲट कॉल) | 9293.84 | 6988.70 |
| ॲमॉर्टायझेशन रिझर्व्ह | 799.01 | 799.01 | गुंतवणूक | 81367.67 | 85231.18 |
| ठेवी | 244545.25 | 216783.55 | दिलेली कर्जे | 154756.43 | 126704.64 |
| वसूलीची बिले नावे बाजूप्रमाणे | 7.32 | 6.16 | येणे व्याज | 3998.98 | 3112.68 |
| देणे असलेले व्याज ठेवींवरील | 7579.72 | 6574.37 | कायम व स्थावर मालमत्ता | 4499.54 | 4089.93 |
| इतर देणी | 12096.19 | 9432.94 | इतर जिंदगी | 9640.68 | 7703.11 |
| थकीत व्याज तरतूद (नावे बाजू प्रमाणे) | 615.14 | 1329.87 | वसूलीची बिले देणे बाजूप्रमाणे | 7.32 | 6.16 |
| शाखा जुळवणी | 138.94 | 13.37 | थकीत व्याज तरतूद (देणे बाजू प्रमाणे ) | 615.14 | 1329.87 |
| चालू वर्षाचा नफा | 3206.66 | 3066.08 | कॉस्ट ऑफ ॲक्विझीशन (इचलकरंजी महिला सहकारी बँक लि.) | 799.01 | 799.01 |
| **एकूण ₹** | **306794.52** | **272292.58** | **एकूण ₹** | **306794.52** | **272292.58** |
| **संभाव्य देणी** | **5053.80** | **2908.87** | | | |

## दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर नफा-तोटा पत्रक

| खर्च | ३१ मार्च, २०१६ ₹ | ३१ मार्च, २०१५ ₹ | जमा | ३१ मार्च, २०१६ ₹ | ३१ मार्च, २०१५ ₹ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावरील दिलेले व्याज | 14749.46 | 12432.83 | मिळालेले व्याज - कर्जावरील व ठेवींवरील | 26874.04 | 23561.01 |
| नोकरवर्गाचा पगार, भत्ते | 3691.59 | 3419.43 | शेअर्सवरील लाभांश | 1.53 | 0.80 |
| संचालकांचे मिटींग भत्ते | 4.17 | 3.93 | कमिशन | 216.22 | 195.38 |
| भाडे, कर व विमा | 1168.95 | 800.61 | भाग हस्तांतरण शुल्क | 0.02 | 0.02 |
| कायदा व व्यावसायिक तज्ञांचे शुल्क | 77.27 | 86.69 | लॉकर भाडे व सेफ कस्टडी | 73.29 | 62.30 |
| टपाल, तार व टेलिफोन खर्च | 133.90 | 83.99 | इतर उत्पन्न | 274.09 | 342.06 |
| हिशेब तपासणी शुल्क | 56.29 | 48.96 | गुंतवणूक घसारा जादा तरतूद (IDR) | 483.51 | 713.79 |
| मालमत्तेवरील घसारा | 795.44 | 659.15 | डेडस्टॉक विक्रीवरील नफा | 2.49 | 9.76 |
| छपाई, लेखनसामग्री व जाहिरात खर्च | 307.11 | 290.68 | गुंतवणूक विक्रीवरील नफा | 392.79 | 231.12 |
| कॉन्ट्रॅक्चुअल खर्च | 137.95 | 99.90 | बुडित व संशयित कर्ज निधीतून जमा | 411.52 | 51.25 |
| सर्वसाधारण खर्च | 705.77 | 574.56 | निर्लिखित कर्ज वसुली | 39.79 | 3.00 |
| तरतूदी | 1726.45 | 1946.91 | डिफर्ड टॅक्स ॲसेट | 3.21 | 0.00 |
| बुडीत कर्ज निर्लेखित | 411.52 | 51.25 | | | |
| आयकर तरतूद | 1600.00 | 1581.00 | | | |
| डिफर्ड टॅक्स लायबिलीटी | 0.00 | 24.58 | | | |
| नफा | 3206.63 | 3066.02 | | | |
| **एकूण ₹** | **28772.50** | **25170.49** | **एकूण ₹** | **28772.50** | **25170.49** |

ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे
दिनांक : १४/०६/२०१६.

सदर तारखेच्या स्वतंत्र दिलेल्या अहवालाप्रमाणे
मे. गोगटे ॲण्ड कं.
सनदी लेखापाल
**सी. ए. यु. व्ही. गोगटे**
भागीदार स. नं. १०९५७४ (FRN-१२४१४४W)
(वैधानिक लेखापरिक्षक)

गोपीनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक लि., मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक

**श्री. रणजीत गो. पाटील**
अध्यक्ष

**श्री. नारायण ग. गावंड**
उपाध्यक्ष

**श्री. सदानंद कृ. नायक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणीची शिफारस

| तपशील | रक्कम | तपशील | रक्कम ( ₹ लाखात) |
|---|---|---|---|
| राखीव निधी २५% | ₹ 801.66 | इमारत निधी | ₹ 169.60 |
| संभाव्य तोटा/नुकसानीसाठी केलेला राखीव निधी १०% | ₹ 320.67 | सुवर्ण महोत्सव निधी | ₹ 15.00 |
| भागधारकांस लाभांश १५% शिफारस | ₹ 859.21 | सहकार शिक्षण निधी | ₹ 32.07 |
| निवडणूक निधी | ₹ 14.00 | सभासद व कर्मचारी शिक्षण निधी | ₹ 15.00 |
| धर्मादाय निधी | ₹ 32.07 | सानुग्रह अनुदान व बोनस | ₹ 607.35 |
| अपग्रेड सॉफ्टवेअर / हार्डवेअर | ₹ 20.00 | गुंतवणूक चढउतार निधी(आयएफआर) | ₹ 200.00 |
| सभासद कल्याण निधी | ₹ 10.00 | पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | ₹ 0.03 |
| लाभांश समानीकरण निधी | ₹ 10.00 | **एकूण ₹** | 3206.66 |
| विशेष आकस्मिक निधी | ₹ 100.00 | | |

# GOGATE & CO.

CHARTERED ACCOUNTANTS

Office No. 107, 1st floor, Punit Apartments, Opp. Modi Ganpati Mandir, 526, Narayan Peth, Pune – 30.


## INDEPENDENT AUDITOR'S REPORT

(Under Section 31 of The Banking Regulation Act 1949 and Section 73 (4) of the
Multi State Co-op Societies Act 2002 and Rule 27 of Multi State Co-op Societies Rules 2002)

To
The Members,
Gopinath Patil Parsik Janata Sahakari Bank Ltd
Kalwa, Thane

**Report on the Financial Statements**

1. We have audited the accompanying financial statements of the 'Gopinath Patil Parsik Janata Sahakari Bank Ltd' which comprise the Balance Sheet as at 31stMarch, 2016 and the Statement of Profit and Loss and the cash flow statement for the year then ended and a summary of significant accounting policies and other explanatory information. Incorporated in these financial statements are the returns of all 61 branches and Head office audited by us.

**Management's Responsibility for the Financial Statements**

2. Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with Banking Regulation Act 1949 (AACS) and Multi State Co-op. Societies Act 2002. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility.**

3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.
4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.
5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Opinion**

6. Subject to our comments and observation contained in part A,B and C of the Audit Memorandum (HO report and Branch reports ) enclosed herewith, In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts together with the notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (AACS) as well as Multi State Co-op. Societies Act 2002, in the manner so required for the bank and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

   (i) In the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31stMarch, 2016;

   (ii) In the case of the Profit and Loss Account of the profit/loss for the year ended on that date; and

   (iii) In the case of the Cash Flow Statement, of cash flows for the year ended on that date.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

7. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in accordance with the provisions of Section29of the Banking Regulation Act, 1949 (AACS)
8. Subject to our comments and observations contained in the Audit Report of even date we report that:
   (a) The Schedules giving the particulars referred to in Rule 27 (3) of Multi State Co-operative Societies Rules 2002 to the extent applicable are attached to report;
   (b) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory;
   (c) The transactions of the Bank, which have come to our notice, have been within the powers of the Bank subject to our comments wherever made in the audit report;
   (d) In our opinion and according to the information given to us, there has been no material impropriety or irregularity in the expenditure or in the realization of money due to the bank;
   (e) The Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns;
   (f) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books;
   (g) The returns received from the branches of the Bank have been found adequate for the purposes of our audit.
9. In our opinion, the Balance Sheet, Profit and Loss Account and Cash Flow Statement comply with the applicable Accounting Standards issued by Institute of Chartered Accountants of India.

**For Gogate and Co.**
**Chartered Accountants**
FRN (124144W)
**CA U V Gogate**
Partner (M. No. (109574)

Place: Kalwa, Thane
Date : 14th June, 2016